दैनिक
# अट्टल संकेत
ATTAL SANKET

Email : attalsanket2023@gmail.com
RNI No. MAHMAR/2023/87816

■ दैनिक ■ छत्रपती संभाजीनगर ■ वर्ष-३ ■ अंक-७६ ■ मंगळवार, दि. ६ मे २०२५ ■ पाने ४ ■ किंमत २ रूपये

■ Daily ■ Chhatrapati sambhajinagar ■ Vol.3 ■ Issue -76 ■ Tuesday, 6 May 2025 ■ Pages-4 ■ Price- 2/-

## मुहूर्त ठरला! ७ मे रोजी देशभरात मॉक ड्रिल घेण्याचे गृह मंत्रालयाचे आदेश

### सर्व आपत्कालीन यंत्रणांना तत्पर ठेवण्याचे निर्देश

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)**

पाकिस्तानच्या पापाचे घडे आता भरले आहेत. पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर भारत-पाकिस्तानमध्ये तणाव पूर्णपणे वाढला आहे. पाकिस्तानवर कोणत्याही क्षणी मोठ्या लष्करी कारवाईची शक्यता निर्माण झाली आहे. त्यासाठीचं आता भारतानं चांगलीच कंबर कसली आहे.

या निमित्ताने केंद्रीय गृह मंत्रालयाने सर्व राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांना ७ मे रोजी मॉक ड्रिल घेण्याचे आदेश दिले आहेत. आपत्कालीन परिस्थितीला तोंड देण्यासाठी प्रशासन किती सज्ज आहे, याची चाचणी घेण्यासाठी हा मॉक ड्रिल घेतला जाणार आहे. राज्यांनी पोलिस, नागरी संरक्षण यंत्रणा, आरोग्य विभाग आणि अन्य आपत्कालीन सेवांशी संबंधित यंत्रणांना तत्पर ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

मॉक ड्रिलमध्ये बॉम्बस्फोट, शस्त्रधारी हल्ले आणि नैसर्गिक आपत्ती यांसारख्या विविध परिस्थितींचा सम ावेश असणार आहे.

**नागरिकांना सहकार्याचं आवाहन**

केंद्रीय गृहमंत्रालयाने ७ मे ला देशभरात सिव्हिल डिफेन्सचं मॉक ड्रिल करण्याचे निर्देश सर्व राज्यांना दिले आहे. संभाव्य हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर मोठा निर्णय आहे. एअर रेड सायरन्सची चाचणी केली जाणार आहे.

सर्वसामान्य, विद्यार्थ्यांना संरक्षणाचं प्रशिक्षण दिलं जाणार आहे. मॉक ड्रिलमध्ये घेतल्या जाणाऱ्या महत्त्वाच्या उपाययोजना करण्यात आली आहे. सरकारकडून नागरिकांना सहकार्याचं आवाहन करण्यात आले आहे.

**मॉक ड्रिलने धोका नाही**

ही मॉक ड्रिल पूर्णतः सरावासाठी असून प्रत्यक्ष धोका नसल्याचं प्रशासनाने स्पष्ट केले आहे. युद्धजन्य परिस्थितीत काय करावं याची जाणीव नागरिकांना करून देणं हाच या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. या पार्श्वभूमीवर पंजाबमधील फिरोजपूर छावणीत ४ मे रोजी ३० मिनिटांचा ब्लॅकआउट ड्रिल पार पडला. रात्री ९ ते ९.३० या वेळेत लाईट बंद ठेवून युद्धाच्या परिस्थितीतील सज्जतेचा आढावा घेण्यात आला.

**भारताचं पाकविरुद्धात मोठं पाऊल**

पहलगाम हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर सोमवारी दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि संरक्षण खात्याचे सचिव राजेश कुमार सिंह यांची महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीपूर्वी पंतप्रधान मोदी नौदल आणि हवाई दलाच्या प्रमुखांना भेटले होते. त्यामुळे संरक्षण खात्याचे सचिव आणि पंतप्रधानांची बैठक महत्त्वाची मानली जात आहे. पंतप्रधान मोदी यांनी भारतीय लष्कराला कारवाईची मोकळीक दिली आहे. त्यामुळे येत्या काही दिवसांत एखादी महत्त्वाची घटना घडणार का, याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे.


**पहलगामच्या हल्ल्यात २६ निष्पापांचा बळी**

पहलगामच्या हल्ल्यात २६ निष्पापांचा बळी गेलाय. या हल्ल्याचं उत्तर आजवरचं सर्वात मोठं उत्तर असेल हे भारताने स्पष्ट केलंय. तणावाच्या पार्श्वभूमीवर सध्या भारत पाकमध्ये शाब्दिक आणि राजकीय वॉर रंगलंय.

आजवरच्या कारवायांमधून भारताने पाकचे दात नेहमीच घशात घातलेत त्यामुळे आत्ता देशवासीय वाट पहात आहे पुढच्या स्ट्राईकची, पाकीस्तान आणि दहशतवाद्यांचं कंबरडं मोडण्याची... त्याची भारतीय सैन्य ज्या प्रकारे तयारी करीत आहे त्यावरून नक्कीच काही तरी मोठं होणार आहे हे वेगळं सांगण्याची आवश्यकता नाही.

### मॉक ड्रीलमध्ये काय होणार?

- गृह मंत्रालयाच्या निर्देशानुसार, नागरिकांचे संरक्षण आणि आपत्कालीन परिस्थितींमध्ये योग्य प्रतिसाद देण्यासाठी या गोष्टींवर सराव होणार आहे.




- हवाई हल्ल्याचा अलर्ट दिल्यास सायरन वाजवणे
- नागरिक व विद्यार्थ्यांना सुरक्षिततेचे प्रशिक्षण देणे
- हल्ल्याच्या वेळी शहर/क्षेत्र 'ब्लॅकआउट' करणे (लाईट बंद ठेवणे)
- महत्त्वाच्या स्थापत्यांनाच लपवण्याची प्रक्रिया
- हल्ला झाल्यास नागरिकांची तातडीने स्थलांतर प्रक्रिया व त्याचा सराव

## शिर्डी साई संस्थान विश्वस्त मंडळाला वेग; साई सेवेसाठी राजकीय 'फिल्डिंग' सुरू!

शिर्डी : देशातील एक अत्यंत श्रद्धास्थान असलेल्या शिर्डी साईबाबा संस्थानच्या नवीन विश्वस्त मंडळ स्थापनेला आता वेग आला आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, येत्या जून महिन्यात हे नवीन मंडळ अस्तित्वात येण्याची शक्यता आहे. गेल्या काही काळापासून रखडलेल्या विकासकामांना त्यामुळे गती मिळणार असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

सन २०२७ मध्ये नाशिकमध्ये होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर, देशविदेशातून येणाऱ्या लाखो भाविकांची संभाव्य गर्दी शिर्डीकडे वळू शकते. त्यामुळे रस्ते, पाणीपुरवठा, गटार यंत्रणा, पार्किंग, लाईटिंग, निवास व्यवस्था या अत्यावश्यक सुविधा विकसित करणे गरजेचे आहे. शासनाकडून पूर्वतयारीचा आराखडा तयार करण्यात आला असला, तरी त्यात शिर्डीचा समावेश नाही. त्यामुळेच साई संस्थानच्या पूर्ण वेळ विश्वस्त मंडळाची आवश्यकता अधिक तीव्रतेने जाणवते.

वाहतुकीचे नियम धाब्यावर बसवणाऱ्या रिक्षा-टॅक्सी चालकांवर ट्रॅफिक पोलिसांची मोठी कारवाई; ४८,००० हून अधिक रिक्षा-टॅक्सी चालकांना ई-चलान

मुंबई : मुंबईत वाहतूक नियमांचा भंग करणाऱ्या रिक्षा आणि टॅक्सी चालकांविरोधात ट्रॅफिक पोलिसांनी जोरदार मोहीम राबवत तब्बल ४८,००० हून अधिक ई-चलान फाडले.

सध्या संस्थानचा कारभार त्रिसदस्यीय समितीकडे आहे, मात्र उच्च न्यायालयाने धोरणात्मक निर्णय घेण्यास त्यांच्या अधिकारांवर मर्यादा घातल्या आहेत. त्यामुळे प्रमुख विकासकामे - जसे की रिंगरोड, पार्किंग प्रकल्प, गार्डन आरक्षण आणि भू-संपादन - हे सर्व थांबले आहेत. शिर्डी नगरपरिषदेच्या निधीअभावी ही कामं साई संस्थानवर अवलंबून आहेत, मात्र अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार विश्वस्त मंडळालाच आहे.

नवीन मंडळात भाजप, राष्ट्रवादी आणि शिवसेना या सत्ताधारी पक्षांचे वर्चस्व असलेले २१ सदस्य असणार आहेत. यामध्ये डॉक्टर, आर्किटेक्ट, वकील, पदवीधर अशा अनुभवी तज्ज्ञांचा समावेश अनिवार्य आहे. त्याशिवाय सात सदस्य हे अहिल्यानगर जिल्ह्यातील स्थानिक रहिवासी असणे आवश्यक आहे. त्यामुळे शिर्डीसह संपूर्ण जिल्ह्यात 'फिल्डिंग' लावण्याची चुरस सुरु झाली आहे.

या प्रक्रियेत जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची भूमिका अत्यंत निर्णायक राहणार आहे. तसेच राज्याचे मुख्यमंत्री आणि विधी व न्याय खात्याचे प्रमुख देवेंद्र फडणवीस टिकाऊ आणि पारदर्शक विश्वस्त मंडळ देणार, अशी भाविकांची आशा आहे.

दरम्यान, गेल्या काही वर्षांपासून संधीची वाट पाहणारे आणि गुढघ्याला बाशिंग बांधून बसलेले इच्छुक आता थेट मुंबईच्या दौऱ्यांवर असून, हे प्रतिष्ठेचे पद आपल्या नावावर लावण्यासाठी प्रयत्नशील आहेत. साईबाबांच्या सेवेसाठी म्हणून ओळखले जाणारे आणि प्रतिष्ठित मानले जाणाऱ्या या पदाची लॉटरी कुणाच्या नशिबात आहे आणि हे पद नक्की कुणाच्या नशिबी येणार? हे लवकरच स्पष्ट होणार आहे.

## दहशतवादविरोधात भारताला मिळाली जपानची साथ

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)**

पहलगाम हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तान यांच्यातील तणाव वाढतच आहे. भारताने पाकिस्तानविरुद्ध अनेक कठोर निर्णय घेतले आहेत.तसेच, भारतीय लष्कराने युद्धाभ्यास सुरू केल्यामुळे पाकिस्तानची घाबरगुंडी उडाली आहे. विशेष म्हणजे, अमेरीका आणि रशियासह अनेक देशांनी भारताला पाठिंबा जाहीर केला आहे. अशातच, आता जपानदेखील भारताच्या बाजूने आला आहे.

भारताचे संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आणि जपानचे संरक्षण मंत्री नाकातानी यांच्यात आज, सोमवारी एक मोठी बैठक झाली. या बैठकीत पहलगाम दहशतवादी हल्ला, भारत आणि पाकिस्तानमधील वाढता तणाव आणि दक्षिण चीन समुद्रात चीनच्या वाढत्या लष्करी हालचालींबाबत चर्चा झाली. याशिवाय, दोन्ही देशांनी प्रादेशिक आणि आंतरराष्ट्रीय सुरक्षा परिस्थिती आणि द्विपक्षीय संरक्षण सहकार्य आणखी वाढवण्यावरही भर देण्यात आला. महत्वाचे म्हणजे, गेल्या ६ महिन्यांत दोन्ही देशांच्या संरक्षण मंत्र्यांची ही दुसरी बैठक आहे.

भारत-जपान संरक्षण मंत्र्यांच्या बैठकीत राजनाथ सिंह म्हणाले की, पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर भारतासोबत मजबूत एकता दाखवल्याबद्दल मी जपान सरकारचे आभार मानू इच्छितो. बैठकीनंतर राजनाथ सिंह यांनी द वर पोस्ट केले की, 'नवी दिल्लीत जपानचे संरक्षण मंत्री जनरल नाकातानी सॅन यांना भेटून आनंद झाला. भारत आणि जपानमध्ये एक विशेष, धोरणात्मक आणि जागतिक भागीदारी आहे. बैठकीदरम्यान, आम्ही संरक्षण सहकार्य आणि प्रादेशिक सुरक्षेवर चर्चा केली. दोन्ही बाजूंनी सर्व प्रकारच्या दहशतवादाचा निषेध केला आणि सीमापार धोक्यांचा सामना करण्यासाठी सहकार्य आणि प्रयत्न वाढवण्याच्या गरजेवर भर दिला.'

## पहलगाम हल्ल्यावर पुतिन यांचा मोदींना फोन, म्हणाले 'प्रत्येक कारवाईला पूर्ण पाठिंबा'

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)**

भारत आणि पाकिस्तानमधील वाढत्या तणावादरम्यान, रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी सोमवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना फोन केला. दहशतवादाविरुद्धच्या लढाईत भारताला पूर्ण पाठिंबा देणार असल्याचे त्यांनी पुन्हा एकदा सांगितले. जम्मू काश्मीर येथील पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा त्यांनी यावेळी निषेध केला, आणि हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या लोकांबद्दल शोक व्यक्त केला आहे.

परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी ट्विटरवर पोस्ट केले आहे की, मोदी आणि पुतीन संभाषणादरम्यान, रशियन राष्ट्राध्यक्षांनी हल्ल्यामागील आणि त्यांच्या समर्थकांना चोख प्रत्युत्तर दिले पाहिजे यावर भर दिला. जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर जवळजवळ दोन आठवड्यांनी पुतिन यांनी भारताला पाठिंबा दर्शवला आहे.

वार्षिक शिखर परिषदेसाठी पंतप्रधान मोदींनी पुतीन यांना केले आमंत्रित

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांना विजय दिनाच्या ८० व्या वर्धापन दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या. या वर्षाच्या अखेरीस भारतात होणाऱ्या वार्षिक शिखर परिषदेसाठी पंतप्रधान मोदीं यांनी रशियन राष्ट्राध्यक्षांना आमंत्रित केले. यापूर्वी, रशियाचे परराष्ट्र मंत्री सर्गेई लावरोव्ह यांनी पहलगाम दहशतवादी हल्ल्याबाबत एस जयशंकर यांच्याशी फोनवर चर्चा केली होती. त्यांनी दोन्ही देशांना संयम बाळगण्याचे आवाहन केले होते.

भारत-पाकिस्तान परिस्थितीवर संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेची बैठक

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमधील परिस्थितीवर संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेची सोमवारी बंद दाराआड बैठक होणार आहे.

या मुद्द्यावर पाकिस्तानने आपत्कालीन बैठक बोलावण्याची मागणी केली. दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानविरुद्ध अनेक कठोर निर्णय घेतले आहेत, ज्यात सिंधू पाणी करार स्थगित करणे, अटारी सीमा बंद करणे आणि राजनैतिक संबंध मर्यादित करणे यांचा समावेश आहे.

## पीओके गमावण्याच्या भीतीने उडाली पाकिस्तानची झोप

इस्लामाबाद : पहलगाममध्ये पाकिस्तान पुरस्कृत अतिरेक्यांनी २६ नागरिकांची हत्या केली. या अतिरेकी हल्ल्यानंतर भारत जास्तीत जास्त अतिरेक्यांच्या तळावर सर्जिकल स्ट्राईक किंवा एअर स्ट्राईक करेल, असा पाकिस्तानचा अंदाज होता. पण भारताने सिंधू नदी पाणी वाटप करार स्थगित केला. तसेच पाकिस्तानी नागरिकांचे व्हिसा रद्द केले. पाकिस्तानसोबतचा सर्व व्यापार थांबवला. पाकिस्तानच्या जहाज, विमान, रेल्वे आणि इतर वाहनांना भारतात बंदी घातली तसेच भारतीय जहाज, विम ान, रेल्वे आणि इतर वाहनांना पाकिस्तानमध्ये जाऊ नका, असे सांगितले. भारत - पाकिस्तान दरम्यानची टपाल सेवा बंद केली. मोदी सरकारने जगभरातून भारताच्या कृतीला पाठिंबा मिळवला. भारतात हवाई दलाने आणि नौदलाने युद्धाभ्यास सुरू केला. या घडामोडी ज्या वेगाने घडल्या ते बघून पाकिस्तानमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले.

भारत हल्ला करेल आणि पाकिस्तान व्याप्त काश्मीर कायमचे हातातून जाईल, या भीतीने पाकिस्तानची झोप उडाली आहे. भारताच्या आक्रमणाच्या भीतीने हजारो दहशतवाद्यांना पाकिस्तान व्याप्त काश्मीरमधून पाकिस्तानमध्ये ठिकठिकाणी आणून ठेवण्यात आले आहे. पाकिस्तान व्याप्त काश्मीरमध्ये कोरोना काळातील लॉकडाऊन सारखी परिस्थिती आहे. फक्त जीवनावश्यक वस्तूंच्या खरेदीसाठी घरातील एक - दोन व्यक्तींना बाहेर पडण्याची परवानगी आहे. इतरांना घराबाहेर पडण्यास मनाई आहे. पाकिस्तानच्या लष्कराने हॉटेल्स, पर्यटन स्थळे, मंगलकार्यालयांचा ताबा घेतला आहे. सामान्यांसाठी हॉटेल सेवा आणि मदरसे बंद आहेत. नागरिकांना अन्न, औषधे आणि पाणी साठवून ठेवण्याचे आवाहन करण्यात आले आहे. अनेक बँकांनी पाकिस्तान व्याप्त काश्मीरमधील त्यांच्या शाखा अनिश्चित काळासाठी बंद केल्या आहेत. पाकिस्तानव्याप्त काश्म ीरमध्ये दररोज काळोख पडू लागताच विजेचा पुरवठा खंडीत केला जात आहे. मशिदींमधून लाऊडस्पीकरवरुन (ध्वनीक्षेपक) दिली जाणारी अजान बंद आहे. पाकिस्तानमध्ये भीतीचे वातावरण आहे. साठेबाजी मोठ्या प्रमाणात सुरू असल्यामुळे महागाई वाढू लागली आहे.

## खुलताबाद शहरात एमआयएम पक्षाला खिंडार; शेकडो कार्यकर्त्यांचा काँग्रेसमध्ये प्रवेश

खुलताबाद - तालुक्यातील राजकारणाला मोठा कलाटणी देत, एमआयएमचे तालुका अध्यक्ष अब्दुल मजीद मणियार यांनी शुक्रवारी आपल्या शेकडो समर्थकांसह काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला. औरंगाबाद येथील नेहरू भवनात झालेल्या या प्रवेश सोहळ्यात काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी तथा अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सचिव माजी आमदार कुणाल चौधरी, खासदार डॉ. कल्याण काळे, माजी मंत्री अनिल पाटील. माजी आमदार एम एम शेख. इब्राहिम पठाण, शेख यांच्या प्रमुख उपस्थिती होती. अब्दुल मजीद मणियार हे गेल्या अनेक वर्षांपासून एमआयएम पक्षात सक्रीय असून तालुका अध्यक्ष पदाची जबाबदारी ते समर्थपणे पार पाडत होते. खुलताबाद शहरातील पाणीटंचाई,काळात अब्दुल मजीद मणियार यांनी खुलताबाद नगरपरिषद मार्फत शहरात पाणीपुरवठा दूषित पाण्याची समस्या मात्र डोके वर काढत होते.शहरात गेल्या काही दिवसापूर्वी शहराचे अनेक भागात नळाला दूषित पाणी येत असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून केल्या जात आहेत. यामध्ये काही भागात दूषित पाणीपुरवठा होत होते. यासंदर्भात नागरिकांनी वेळोवेळी नगरपरिषद च्या पाणीपुरवठा अभियंता यांना सांगून ही या पाणीपुरवठ्यात कुठलीही सुधारणा झाली नाही. मात्र नगरपरिषद पाणीपुरवठा विभागाने दुरुस्तीचे काम केल्याची माहिती दिली होते.त्वचारोग आणि पोटाच्या विकारांना आमंत्रण मिळत असल्याने नागरिकांतून संताप व्यक्त करण्यात आले होते. मात्र या गंभीर प्रश्ना संदर्भात अब्दुल मजीद मनियार यांनी न्यायालयीन लढाई उभा केले होते.. यामुळे खुलताबाद शहरातील नागरिकाशी चांगले संबंध असल्यामुळे खुलताबाद शहरातील नागरिकाचे अडचणी यावर त्यांनी सातत्याने आवाज उठवला आहे. त्यांच्या सामाजिक कार्यामुळे विशेषतः तरुण वर्गात त्यांची लोकप्रियता अधिक आहे. मणियार यांच्या काँग्रेस प्रवेशाम ुळे खुलताबाद शहरासह तालुक्यात राजकीय समीकरणं बदलण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

....पान४ वर

## मंत्रिमंडळाच्या आयपीएलमध्ये फडणवीसांची बाजी

महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेच्या दिनी अर्थात एक मे रोजी राज्यातील भाजपा-शिवसेना-राष्ट्रवादी या तीन पक्षांच्या महायुतीच्या सरकारचा शंभर दिवसांच्या कामगिरीचा मूल्यमापन करणारा निकाल जाहीर झाला आणि राज्य सरकारच्या या निकालाने आगामी भविष्यकाळात राज्यातील महायुती सरकार नेमके कोणत्या दिशेने वाटचाल करणार आहे त्या विकासाच्या वाटचालीची दिशा देखील या शंभर दिवसांच्या निकालाने अत्यंत स्पष्ट झाली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि दुसरे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांची जर आजवरची संसदीय कामकाजातील ज्येष्ठता आणि अनुभव लक्षात घेतला, तर या तिघांकडे ज्या खात्यांचा निकाल हा अपेक्षेपेक्षा कमी आला आहे तो निकाल भरून काढायला या तिघाही ज्येष्ठ आणि अभ्यासू नेत्यांना फारसा काही वेळ लागेल असे समजण्याचे कारण नाही. त्यामुळे शंभर दिवसांची ही महाराष्ट्र मंत्रिमंडळाची कामगिरी दाखवणारी आयपीएल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बाजी मारत पटकावली आहे, असे म्हटले तर कोणाला आश्चर्य वाटण्याचे कारण नाही.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केलेल्या १०० दिवसांच्या कार्यालयीन सुधारणा मोहिमेअंतर्गत मूल्यमापनाचा निकाल जाहीर करण्यात आला आहे. त्यानुसार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या मंत्री आदिती तटकरे यांच्याकडे असलेल्या महिला व बालविकास विभागाने राज्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. लोकसभेच्या निवडणूक निकालानंतर राज्यात पुन्हा महायुतीचे सरकार आणण्यात तत्कालीन महिला व बालकल्याण विकास मंत्री आदिती तटकरे यांच्या खात्याचा सिंहाचा वाटा होता हे मान्य केले पाहिजे. मंत्रिमंडळाच्या स्तरावर आणि पक्ष संघटनेमध्ये दोन्ही जबाबदाऱ्या यशस्वीपणे पार पाडणारे जे हाताच्या बोटावर मोजता येतील असे महाराष्ट्रात मंत्री आहेत. त्यामध्ये एक आदिती तटकरे आणि दुसरे म्हणजे राज्याचे मत्स्य व्यवसाय आणि बंदरे मंत्री नितेश राणे आणि त्याचबरोबर शिवेंद्रराजे भोसले या तरुण आणि तडफदार मंत्र्यांची नावे अग्रक्रमाने घ्यावी लागतील. मंत्री नितेश राणे यांनी देखील मत्स्य व्यवसाय आणि बंदरे या खात्यांमध्ये गेल्या शंभर दिवसांत जो कामांचा सपाटा लावला आहे, त्याचा वेग आणि त्यांच्यातील कामाची ऊर्जा हे निश्चितच प्रशंसनीय आहे. त्यातील सर्वात मोठा निर्णय म्हणजे राज्यातील मत्स्य व्यवसायाला राज्य सरकारने नुकताच दिलेला कृषीचा दर्जा हा आहे. मंत्री नितेश राणे यांच्या केवळ या एका निर्णयाने महाराष्ट्रातील मच्छीमार करणाऱ्या कोळी बांधवांना शेतकऱ्यांप्रमाणेच यापुढे सर्व सरकारी लाभ मिळण्यास ते पात्र ठरणार आहेत. मंत्री नितेश राणे यांनी ज्याप्रमाणे राज्याचा मत्स्य व्यवसाय आणि बंदरे मंत्री म्हणून राज्य मंत्रिमंडळाच्या कामकाजात स्वतः चा ठसा उमटवला आहे त्याचबरोबर कोकणातील आणि विशेषत: सिंधुदुर्ग जिल्ह्यातील भाजपाची पक्ष संघटना ही अधिकाधिक कशी बळकट होईल याकडे देखील त्यांनी गेल्या काही दिवसांमध्ये कटाक्षाने लक्ष दिले आहे. भाजपाच्या कडवट हिंदुत्ववादी विचारांचा आक्रमक आणि आश्वासक तरुण चेहरा ही मंत्री नितेश राणे यांची ओळख बनली आहे.

सार्वजनिक बांधकाम खात्याला पहिल्या टॉप फाईव्ह मध्ये आणण्यात मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांचे योगदानही महत्त्वपूर्ण ठरले आहे. तसेच या पहिल्या अव्वल पाच क्रमांकातील परिवहन मंत्री प्रताप सरनाईक आणि राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे ही दोन नावेदेखील वैशिष्ट्यपूर्ण आहेत. ज्या कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांच्यावर न्यायालयाने दिलेल्या निर्देशांमुळे विरोधकांनी टीकेची झोड उठवली होती त्या माणिकराव कोकाटे यांच्या कृषी खात्याने मात्र शंभर दिवसांच्या या कार्यक्रमात पहिल्या पाच अव्वल खात्यांमध्ये क्रमांक मिळवून विरोधकांच्या आरोपांमधली हवाच काढून टाकली. राज्याचे परिवहन मंत्री व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या ठाणे शहरातील शिवसेनेचेच कॅबिनेट मंत्री असलेले प्रताप सरनाईक यांच्या परिवहन खात्याने देखील पहिल्या पाच क्रमांकामध्ये स्थान पटकावल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या असतील. ज्या परिवहन खात्याकडे एसटी कर्मचाऱ्यांचे पूर्ण पगार देण्यासाठी देखील पैसे नव्हते आणि त्यासाठी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांना सर्व राज शिष्टाचार बाजूला सारत मंत्रालयातील परिवहन विभागाचे प्रधान सचिव जे कोणी एकेकाळी ठाणे महापालिकेचे आयुक्त देखील होते त्या संजय सिटी यांच्या दालनात जावे लागले त्या परिवहन खात्याला प्रताप सरनाईक यांनी पहिल्या शंभर दिवसांतच अव्वल ५ खात्यांमध्ये आणण्याची जी किमया केली आहे. ती खरोखरच कौतुकास्पद आहे. भारतीय गुणवत्ता परिषद (टींरश्रळीूं उेंपलळश्र`ष खपवळर) मार्फत या मोहिमेचे मूल्यांकन करण्यात आले. वेबसाईट कार्यक्षमता, कार्यालयीन सोयीसुविधा, तक्रार निवारण व्यवस्था, गुंतवणूक अनुकूलता, नागरिकांसाठी सेवा सुलभता, तंत्रज्ञान वापर अशा दहा निकषांवर आधारित मूल्यमापन करण्यात आले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत सांगितले की , 'ही मोहीम म्हणजे केवळ व्यवस्थापन नाही, तर उत्तरदायित्व, पारदर्शकता आणि लोकहितासाठी कार्यक्षम प्रशासनाचे प्रतिबिंब आहे. या उत्कृष्ट अधिकाऱ्यांनी इतरांसमोर आदर्श निर्माण केला आहे. ' शासनाच्या सर्व ४८ विभागांनी १०० दिवसांचा धोरणात्मक बाबींचा कार्यक्रम हाती घेऊन महत्त्वाची नवीन धोरणे, दूरगामी निर्णय व लोकाभिमुख उपक्रमांची आखणी सुरू केली. गेल्या १०० दिवसांत या सर्व विभागांनी निश्चित केलेल्या ९०२ धोरणात्मक उद्दिष्टांपैकी ७०६ उद्दिष्टे (७८%) पूर्णतः साध्य केली आहे तर उर्वरित १९६ उद्दिष्टे पूर्ण होईपर्यंत संबंधित विभाग आपले काम चालूच ठेवतील. ९०२ पैकी ७०६ उद्दिष्टे गाठणे हे काही थोडेथोडके नक्कीच नाही. एकूण ४८ विभागांपैकी १२ विभागांनी आपली १००% उद्दिष्ट पूर्तता केली आहे, तर आणखी १८ विभागांनी ८०% पेक्षा जास्त उद्दिष्टे साध्य केली आहेत. असे हे जिल्हानिहाय, विभागनिहाय आणि खातेनिहाय निकाल आहेत.

आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडील ऊर्जा खाते, गृह खाते आणि त्याचबरोबर सामान्य प्रशासन विभाग यांचा याबाबतीतील निकाल हा अन्य खात्यांच्या तुलनेत निश्चितच कमी आहे. तीच स्थिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडील गृहनिर्माण आणि नगरविकास खात्याचे आहे. दुसरे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्याकडील उत्पादन शुल्क खात्याची कामगिरी देखील या तुलनेत समाधानकारक नाही अशी आकडेवारी सांगते. अर्थात असे जरी असले तरी देखील हे लक्षात घेतले पाहिजे की मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे राज्याचे या अत्यंत कठीण आणि प्रतिकूल राजकीय परिस्थितीत तब्बल तिसऱ्यांदा मुख्यमंत्री झाले. हे तीनही मातब्बर आणि प्रशासनाचा दांडगा अनुभव असलेले नेते त्यांच्या खात्यातील कमतरता झपाट्याने भरून काढतील याबाबत शंका घेण्याचे कारणच नाही. शक्तिपीठ महामार्गाचे काम राज्यातील महायुती सरकारने युद्धपातळीवर हाती घेतले आहे.

# जोगिणी व देवदासी प्रथेला प्रतिबंध!

### (छ.शाहू महाराज स्मृती दिन)

राजर्षी शाहू महाराजांची विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्याशी भेट झाली. बाबासाहेबांच्या मूकनायक या वृत्तपत्रास व पुढे त्यांच्या इंग्लंडमधील उच्चशिक्षणास त्यांनी अर्थसाहाय्य केले. माणगाव व नागपूर येथील अस्पृश्यता निवारण परिषदांत त्यांच्याबरोबर सहभागी होऊन अस्पृश्यांना त्यांचा खरा पुढारी मिळाल्याबद्दल त्यांनी त्यांचा गौरव केला. अस्पृश्यतेबरोबरच जातिभेदाशी त्यांनी अखेरपर्यंत संघर्ष केला. आंतरजातीय विवाह हा जातिभेदावर रामबाण उपाय वाटून त्यांनी आंतरजातीय विवाहास कायदेशीर मान्यता दिली. स्वत: पुढाकार घेऊन अनेक आंतरजातीय विवाह घडवून आणले. तसेच बालविवाहास प्रतिबंध करून नोंदणी विवाहाचा कायदा जारी केला. घटस्फोटास व विधवापुनर्विवाहास कायदेशीर मान्यता दिली. कुटुंबात होणाऱ्या शारीरिक व मानसिक छळांपासून स्त्रीला संरक्षण देणारा कायदाही त्यांनी मंजूर केला. मागासलेल्या वर्गांतील मुलींना व स्त्रियांना मोफत शिक्षणाची सुविधा निमर्ण केली. आपली राजकीय कारकीर्द समस्त समाजांना न्याय देण्यात खर्ची घातली होती, म्हणूनच त्यांची जयंती सामाजिक न्याय दिन म्हणून उत्साहाने साजरी केली जाते.

सामाजिक सुधारणांबरोबरच त्यांनी शेतीस व उद्योगधंद्यांस प्रोत्साहन दिले. अनेक कृषी व औद्योगिक प्रदर्शने भरविली. पन्हाळ्यावर चहा, कॉफी, रबर यांच्या लागवडींचे प्रयोग केले. कृषी उत्पादनासाठी शाहूपुरी, जयसिंगपूर यांसारख्या बाजारपेठा वसविल्या. त्यामुळे कोल्हापूर ही गुळाची बाजारपेठ म्हणून देशात प्रसिद्ध पावली. शाहूंनी कोल्हापुरात कारखानदारीचा पाया रचला. शाहू मिलची स्थापना करून आधुनिक वस्त्रोद्योगास त्यांनी चालना दिली. शाहूंनी बांधलेले राधानगरीचे धरण कृषी क्षेत्रात संस्थानचा कायापालट करणारा उपक्रम ठरला. संस्थानी मुलखातील हे सर्वांत मोठे धरण बांधून त्यांनी आपले संस्थान सुजलाम्-सुफलाम् करून टाकले. त्यांनी सहकारी संस्थांचा कायदा करून सहकार चळवळीची मुहूर्तमेढ रोवली.

छत्रपती शाहू महाराज कोल्हापूर महाराष्ट्रातील करवीर तथा कोल्हापूर संस्थानचे प्रागतिक अधिपती आणि थोर समाजसुधारक होत. प्राथमिक शिक्षण, जातिभेद-निवारण, अस्पृश्यता-निवारण आदी सुधारणांचे पुरस्कर्ते होते. त्यांचा जन्म दि.२६ जून १८७४ रोजी कागलच्या जहागीरदार घाटगे घराण्यात जयसिंगराव आणि राधाबाई या दांपत्याच्या पोटी झाला. त्यांचे पूर्वाश्रमीचे नाव यशवंतराव होते. चौथ्या शिवाजींच्या अकाली निधनानंतर ते दि.१७ मार्च १८८४ रोजी कोल्हापूरच्या गादीवर दत्तक गेले. राजकोट व धारवाड येथे त्यांचे शिक्षण झाले. सर फ्रेझर व रघुनाथराव सबनीस यांसारखे गुरू त्यांना मिळाले. विद्यार्थिदशेत त्यांनी इंग्रजी, संस्कृत, इतिहास, राज्यशास्त्र इ. विषयांचा अभ्यास केला. त्यांना दि.२ एप्रिल १८९४ रोजी राज्याधिकार प्राप्त झाला. तत्पूर्वी बडोद्याच्या गुणाजीराव खानविलकर यांच्या लक्ष्मीबाई या कन्येबरोबर सन १८९१ साली त्यांचा विवाह झाला. त्यांना राजाराम व शिवाजी हे दोन मुलगे आणि राधाबाई-आक्कासाहेब व आऊबाई या दोन कन्या झाल्या. त्यांनी प्रशासन- यंत्रणेनची पुनर्रचना करून बहुजन समाजातील कर्तबगार व गुणी व्यक्तींना अधिकारावर नेमण्यास सुरुवात केली. सन १८९७-९८ साली प्रथम दुष्काळ व नंतर प्लेग अशी संकटे कोसळली.

मागासलेल्या जातींत शिक्षणाबद्दल फारशी आस्था नसल्याने व त्याचे कारण शिक्षण घेऊनही सरकारी नोकरी लाभण्याची शक्यता नसल्याने त्यांनी दि.२६ जुलै १९०२ रोजी कोल्हापूर संस्थानातील ५० टक्के शासकीय नोकऱ्या मागास वर्गासाठी राखीव ठेवल्याचा जाहीरनामा काढला. राखीव जागांचे धोरण अमलात आणणारे ते भारतातील पहिले राज्यकर्ते ठरले. अस्पृश्यतेचे उच्चाटन हे आपले जीवितकर्तव्य मानले. संस्थानातील शाळा, पाणवठे, विहिरी, दवाखाने, कचेऱ्या आदी सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यता पाळण्यास त्यांनी कायद्याने प्रतिबंध केला. त्यासाठी अनेक वटहुकूम जारी केले. त्यांनी अस्पृश्यांना सरकारी नोकरीत घेतले. समाजातील तलाठ्यासारख्या प्रतिष्ठेच्या जागा दिल्या. त्यांच्यापैकी अनेकांना माहूत, हूलस्वार, पोलीस, स्वत:चे मोटारचालक म्हणून नेमले. भटक्या व विमुक्त जातींना जवळ करून त्यांचे जीवन स्थिर केले. त्यांना आपले रक्षक म्हणून नेमले. खेड्यापाड्यांतील बलुतेदारांनाही त्यांच्या बलुतेपद्धतीतून मुक्त करून त्यांना समाजातील सर्व उद्योगधंदे खुले केले. जोगिणी व देवदासी प्रथेस प्रतिबंध करणारा कायदा जारी केला. सन १९०२ साली सातव्या एडवर्डच्या राज्यारोहणानिमित्त त्यांनी युरोपचा दौरा केला. तेथील भौतिक प्रगतीचा मोठा प्रभाव त्यांच्यावर पडला; त्यामुळे त्यांचे अनुभवविश्व समृद्ध झाले. बहुजन समाज शिकून शहाणा झाल्याशिवाय त्यांचे दारिद्र, अज्ञान व अंधश्रद्धा नष्ट होणार नाहीत, हे जाणून त्यांनी शिक्षणाच्या, विशेषतः प्राथमिक शिक्षणाच्या प्रसारावर भर दिला. त्यानुसार त्यांनी आपल्या संस्थानात सन १९१७मध्ये सक्तीच्या मोफत प्राथमिक शिक्षणाचा कायदा केला आणि तो अमलात आणला.



– संकलन व शब्दांकन –
**श्री एन. के. कुमार**
जी. से.नि.अध्यापक.
गडचिरोली मोबा- ७७७५०४१०८६.

प्रत्येक खेड्यात प्राथमिक शाळा सुरू केली. ते शिक्षणसम्राट महात्मा फुलेंच्या सत्यशोधक विचारसरणीकडे आकृष्ट झाले. सत्यशोधक तत्त्वांना त्यांचा पाठिंबा होता. मराठ्यांसाठी सन १९२०मध्ये स्वतंत्र क्षात्र जगद्गुरू पद निर्माण करून त्यावर सदाशिवराव पाटील या उच्चविद्याविभूषित तरुणास नेमले. त्यांनी संगीत, नाट्य, चित्रकला, मल्लविद्या आदी कलांना राजाश्रय देऊन महाराष्ट्रात कलेच्या क्षेत्रात स्पृहणीय कामगिरी केली. अनेक गायक-गायिकांनी त्यांच्या आश्रयाने भारतभर कीर्ती संपादन केली. त्यांनी अनेक नाटक कंपन्यांना व गुणी कलावंतांना आश्रय दिला. मल्लविद्येच्या प्रांतात त्यांनी संस्थानासह सर्व देशांतील मल्लांना उदार आश्रय दिला. रोमच्या आखाड्याच्या धर्तीवर कोल्हापुरात कुस्तीचे मैदान बांधले. त्यांच्या कारकीर्दीत कोल्हापूर ही मल्लविद्येची पंढरी बनली. दस्तूरखुद्द महाराज हे मल्लांचे मल्ल म्हणून प्रसिद्ध होते. पट्टीचा शिकारी म्हणून त्यांचा लौकिक होता.

छ.शाहूंच्या सामाजिक कार्याचा गौरव म्हणून कानपूर येथे कुर्मी क्षत्रिय सभेने सन १९१९ साली त्यांना राजर्षी पदवी बहाल केली. त्यांच्या कार्यामुळे दलित-पतितांचा उद्धारक, रयतेचा राजा म्हणून त्यांची प्रतिमा जनसामान्यात निर्माण झाली. या राजाने अज्ञानी बहुजन समाजाला जागृत करण्याचे व्रत अखेरपर्यंत सांभाळले. अखेरच्या दिवसांत द्वितीय चिरंजीव शिवाजी यांच्या अपघाती निधनाने सन १९१८मध्ये ते खचून गेले, तशातच मधुमेहाने ते ग्रासले होते. अखेर मुंबई येथे दि.६ मे १९२२ रोजी त्यांचे वयाच्या अवघ्या अठ्ठेचाळीसाव्या वर्षी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्यानंतर त्यांचे पुत्र राजाराम महाराज कोल्हापूरच्या गादीवर आले.

!! छ.शाहू महाराज स्मृतिदिन निमित्त त्यांना व त्यांच्या लोककल्याणकारी कार्यांना मानाचा लवून मुजरा !!

## चक्क स्मशानभूमीतच वाढदिवस थाटामाटात संपन्न

# स्मशानभूमीत राहणारे माणसंच त्यांचा आनंद द्विगुणित करण्यासाठी स्मशानभूमीत वाढदिवस साजरा केला -रामेश्वर दरेकर

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

आजपर्यंत वाढदिवसाच्या बाबतीत विविध रोमांचक घटना आपण बघितल्या आहेत. कुणी आपला वाढदिवस अनाथाश्रम, वृद्धाश्रम तसेच मोठं मोठ्या हॉटेलमध्ये, देशविदेशात जाऊन साजरा करत, कुणी विविध उपक्रम राबवतात तर कुणी कुणी गोरगरिबांना मदत करुन वाढदिवस साजरा करतात. कुणी परिवारा सोबत मौज मजा करतात. मात्र कुणीही आजपर्यंत आपला वाढदिवस स्मशानभूमीत साजरा करताना बघितले किंवा ऐकलं सुद्धा नाही.कारण स्मशानभूमी भुमि म्हणजे मृत्यूचा सापळा, माणसाच्या आयुष्यातील शेवटचा दिवस, स्मशान भूमी म्हणजे दुःखाचा महासागर असंच बोललं जातं येथे फक्त दुःखच दुःख पेरले आहे.

कुणालाच आजपर्यंत स्मशानभूमीत सुख शोधता आले नाही. मात्र छत्रपती संभाजीनगर येथील दैनिक बुलंद शक्ती या वर्तमानपत्राचे मुख्य संपादक रामेश्वर शिवाजी दरेकर यांनी स्मशानभूमीत सुख शोधलं आहे. त्यांनी आपला वाढदिवस चक्क स्मशानभूमीत साजरा करुन एक नवा आदर्श महाराष्ट्रांतील नव्हे तर देशातील नागरिकांसमोर ठेवला आहे. छत्रपती संभाजीनगर शहरातील समर्थनगर येथील स्मशानभूमीत रामेश्वर शिवाजी दरेकर यांनी आपला वाढदिवस मोठ्या थाटामाटात साजरा केला.

संपुर्ण स्मशानभूमीत छान डेकोरेशन पहायला मिळाले. सजावट पाहून वाढदिवस साजरा करायला आलेल्या सगळ्या जणांना धक्का बसला. हा वाढदिवस म्हणजे ऐतिहासिक वाढदिवस आहे, आम्ही याचे साक्षीदार आहोत याचा आम्हाला अभिमान असं मत वाढदिवसाच्या निमित्ताने शुभेच्छा देण्यासाठी आलेल्या विविध दैनिकाचे संपादक,पत्रकार विविध राजकीय सामाजिक संघटना नेते यांनी मत व्यक्त केले. रामेश्वर शिवाजी दरेकर यांनी स्वतःचया कुटुंबाला वाढदिवसाच्या दिवशी नवे कपडे न घेता स्मशानभूमीत राहणारे कुटुंब, या सगळ्यांना वयस्कर आजीला नववारी नाटी, लहान मुलांना ड्रेस, महिलांना साड्या, किराणा सामान दिल.विशेष म्हणजे वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी आलेल्या सर्वांनी गिफ्ट आणलेल्या वस्तू स्मशानभूमीत राहणारे कुटुंब यांना देऊन त्यांचा आनंद द्विगुणित केला.

ी या स्मशानभूमीत राहणारे कुटुंब यांच्या डोळ्यात आनंदाश्रू पहायला मिळाले. वाढदिवस साजरा करत असताना या कुटुंबाच्या चेहरा हसरा बघुन जणू त्यांना खरं स्वातंत्र्य मिळाले असल्याचा भास होत होता. रामेश्वर शिवाजी दरेकर यांनी स्मशानभूमीत वाढदिवस साजरा केला याची सर्वत्र जोरदार चर्चा सुरू आहे. तसंच त्याचं कौतुक देखील केल जात आहे.



सकाळपासून फेसबुक, व्हाट्सअप इन्स्टाग्रामवर हजारो जणांनी शुभेच्छा दिल्या दरवर्षी प्रमाणे या वर्षी वाढदिवस साजरा कुठं करायचा हे अनेक जणांनी विचारलं स्मशानभूमीत वाढदिवस साजरा करायचा असं म्हणताच सगळे अवाक होत होती. ज्यांना स्मशानभूमी सांगण्यात आले ते आलेच नाही ज्यांना कार्तिकी हॉटेल असं सांगण्यात आलं ते सगळेच आले.वाढदिवस स्मशानभूमीत करायचं ठरवलं आणि त्या पद्धतीने संपूर्ण स्मशानभूमीत सजावट केली. स्मशानभूमीत राहणारे कुटुंब यांना नवनवीन कपडे सगळ्यांना दिली. हे खुप मोठं काम नाही केले कर्तव्य पार पाडलं आहे, असे दरेकर यांनी सांगितले.

स्मशानभूमीत राहणाऱ्या कुटुंबासाठी किराणा आणि आलेल्या सगळ्यांच्या गिफ्ट त्यांना देऊन टाकल्या स्मशानभूमीत वाढदिवस साजरा करत असताना स्मशानभूमीत राहणारे कुटुंब यांच्या चेहऱ्यावर जो आनंद पहायला मिळाला तो आनंद हा अमर्याद समुद्रा सारखा होता. जो मी कधीच विसरणार नाही.माणसाला माणसाने माणसा सारख वागवलं पाहिजे. स्मशानभूमीत राहणारे पण माणसंच आहेत.

खरे दानाचे वाटेकरी ते आहे त्यांच्या मुलांना उच्च शिक्षण देऊन मोठमोठ्या पदांवर नौकरी मिळाली पाहिजे यासाठी सरकारने पाऊल उचलले पाहिजे. जन्माला आलेल्या सर्वांचा शेवटचा सखा मित्र हा स्मशानभूमीत राहणारे कुटुंब असतं आपल प्रेत जळाले की नाही हे पाहण्यासाठी ज्यांच्या साठी आयुष्य घालवल ते कुणीच थांबत नाही मात्र स्मशानभूमीत राहणारे कुटुंब यांच्या साठी काही केलेलं नसताना देखील ते आपला शेवट इमानदारी पुर्वक करतात जे आपला शेवट करतात त्यांना मदत करणं आपण विसरतो.यामुळे यांचा आनंद द्विगुणित करण्यासाठी हा वाढदिवस साजरा केला आहे. माझ्या सारख्या अनेक जणांनी स्मशानभूमीत राहणारे कुटुंब यांना मदत केली पाहिजे त्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी पुढं आलं पाहिजे.

स्मशानभूमीत भुतं नसतात खरे भुतं माणसं आहेत जे जिवंतपणी आईवडिलांना सांभाळत नाही, खुन बलात्कार आया बहिणीवर भरदिवसा करुन हत्या करतात शेतकरी यांच्या पिकांना हमीभाव न देणारे सत्तेवर असलेले आजपर्यंतच सगळंच सरकार नेते भुतं आहे. खुन, चोरी करणारे हे सगळे भुत आहे. खुर्चीवर बसून गोरगरिबांना लुटणारे अधिकारी भुतं आहे. स्मशानभूमीत भुतं नाही तर माणसं राहतात.

संपादक राहुल डोंगरे, पत्रकार अशोक मिसाळ,पत्रकार लक्ष्मण दिवसे, पत्रकार संतोष राठोड, रविकांत राठोड बंजारा ब्रिगेड संस्थापक अध्यक्ष, संपादक रामेश्वर शिवाजी दरेकर,संपादक सुनील खराबे, पत्रकार धंतोले , संपादक देविदास कोळेकर, संपादक फिरोज शेख, संपादक बबन सोनवणे ,संपादक बाजीराव सोनवणे पत्रकार सुनील निकाळजे, संपादक शफिक शेख, संपादक रवी फडणीस, पत्रकार राजू प्रधान, संपादक फेरोज पठाण, संपादक कय्युम खान, संपादक अंबादास तळणकर, पत्रकार अनिस रामपुरे, तसेच स्मशानभूमीत राहणारे कुटुंब, जुगलकिशोर किशनलाल जैस्वाल, विशाल जैस्वाल, शोएब महंमद पठाण, शेरा पठाण, छायाचित्र मध्ये दिसत आहे.

## श्री क्षेत्र जैनगिरी (जटवाडा) येथे अमावस्या निमीत्त २७ रोजी पंचामृत अभिषेक व महाप्रसादाचे आयोजन



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

शहरापासुन १२ कि.मी.अंतरावरील असलेल्या हजारो जैन बांधवांचे श्रध्दास्थान श्री.१००८ संकटहर पाश्र्वनाथ दिगंबर जैन अतिशय क्षेत्र जैनगिरी जटवाडा येथे दिनांक २७ एप्रिल रविवार २०२५ रोजी अमावस्या निमीत्त सकाळी १० वाजता मुलनायक श्री.संकटहर पाश्र्वनाथ भगवंताचा पंचामृत अभिषेक णमोकार भक्ती मंडळचा सानिध्यात करण्यात येणार आहे. यावेळी सर्व उपस्थित समाज बांधवांना सकाळी ११ते २ या वेळेस ताराचंद बाबु लाल प्रफुल वर्धमान श्रीपाल शुभम - अभीशेक यश पाडे, साषटे पिपळगाव वाला परीवार छत्रपती सभाजीनगर यांच्या वतीने महाप्रसाद देण्यात येणार आहे

अमावस्या निमीत्त सकाळी १० वाजता मुलनायक भगवंताचा पंचामृत अभिषेक नित्यनियम पुजा आरती करण्यात येणार आहे तरी समाज बांधवांनी मोठया संख्येने उपस्थित राहुन अभिषेक व महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन महाप्रसादी दाता परिवार व जटवाडा क्षेत्राचे विश्वस्थ मंडळ यांनी केले आहे

श्री.क्षेत्र जैनगिरी येथे महिन्याच्या प्रत्येक अमावस्येला भगवंताचा पंचामृत अभिषेक करण्यात येत असतो तसेच यावेळी महाप्रसादाचेही आयोजन केले जाते.

# बुटाच्या लेसने घेतला मॉडेलचा जीव, मृतदेह टॅक्सीत घेऊन फिरला खुनी; हत्येची थरारक कहाणी

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

वेळ दुपारची. तारीख १५ ऑक्टोबर २०१८. मुंबई पोलिसांच्या नियंत्रण कक्षाचा फोन खणाणला. नियंत्रण कक्षातील एका अधिकाऱ्याने फोन घेतला. फोन करणाऱ्याने टॅक्सीचालक असल्याचे सांगत माहिती देण्यास सुरुवात केली. माझ्या टॅक्सीतून आलेल्या व्यक्तीने एका झाडाजवळ जड सुटकेस फेकून दिली. नंतर रिक्षा करुन कुठेतरी झपाट्याने निघून गेला. ही माहिती फोन करणाऱ्याने दिली. पोलिसांनी फोन करणाऱ्या व्यक्तीने सुटकेस कुठे फेकण्यात आली, त्या जागेचा पत्ता सांगितला. माहिती मिळताच पोलिसांचा नियंत्रण कक्ष सक्रीय झाला.

ज्या ठिकाणी सुटकेस फेकण्यात आल्याचे सांगण्यात आले होते तिथे जवळच असलेल्या पोलिसांना माहिती देण्यात आली. पोलीस घटनास्थळी पोहोचले. झाडाजवळ फेकण्यात आलेली सुटकेस पोलिसांनी ताब्यात घेतली. सुटकेसमध्ये काय आहे हे बघण्यासाठी ती उघडण्यात आली तेव्हा उपस्थित असलेल्या सगळ्यांचे डोळे विस्फारले.

सुटकेसमध्ये होता एका २० - २२ वर्षांच्या तरुणीचा मृतदेह... ही धक्कादायक घडली ती मुंबईतील मालाडमध्ये. पोलिसांनी मृतदेह बघताच तातडीने परिसरातले सगळे सीसीटीव्ही फूटेज ताब्यात घेतले आणि तपासले. फोन करुन पोलिसांना माहिती देणाऱ्या व्यक्तीला शोधून त्याचीही चौकशी करण्यात आली. या चौकशीअंती सुटकेस फेकून पळालेल्या व्यक्तीला शोधून अटक करण्यात आली. अवघ्या काही तासांत कारवाई करण्यात आली. पोलिसांनी सुटकेस फेकणाऱ्याला अटक केली.

या अटकेतील व्यक्तीचे नाव होते मुझम्मिल सईद. सईदने ज्या तरुणीचा मृतदेह सुटकेसमध्ये भरुन फेकला होता ती होती राजस्थानच्या कोटा शहरातील एक उदयोन्मुख मॉडेल. मॉडेलचे नाव होते मानसी दीक्षित. मानसीची हत्या का करण्यात आली, ही हत्या कोणी आणि कशा प्रकारे केली अशा सर्व प्रश्नांची उत्तरं पोलिसांना शोधायची होती. ही उत्तरं शोधण्यासाठी सुटकेस फेकणाऱ्याची कसून चौकशी करण्यात आली. मिस कोटा ब्युटी कॉन्टेस्ट २०१४ मध्ये मानसी दीक्षित ही पहिली रनर अप झाली होती.

काही वर्षांनी ती मुंबईत आली आणि तिला मालिकांमध्ये काम मिळू लागले. इथेच सोशल मीडियाद्वारे मानसीची मुझम्मिल सईदशी ओळख झाली. मुझम्मिल सईदने फेसबुकवरुन मानसीला स्वतःची ओळख एक अभिनेता म्हणून करुन दिली होती. मानसी आणि मुझम्मिल सईद यांच्यात ऑनलाईन गप्पा वाढू लागल्या. मूळच्या हैदराबादच्या अलेल्या मुझम्मिल सईदचे मुंबईत जोगेश्वरी येथे घर होते.

एकेदिवशी संधी साधून मुझम्मिल सईदने मानसीला स्वतःच्या जोगेश्वरीच्या फोटोशूटसाठी बोलावले. निर्माता - दिग्दर्शक यांना दाखवण्यासाठी फोटोशूट करतो असे सांगून मुझम्मिल सईदने मानसीला घरी बोलावले. फोटोशूटच्या निमित्ताने मुझम्मिल सईदने मानसीशी जवळीक साधण्याचा प्रयत्न केला.

मानसीने विरोध केला त्यावेळी चिडलेल्या मुझम्मिल सईदने जवळच असलेले स्टूल मानसीच्या डोक्यावर मारले. या आघातामुळे मानसी बेसुद्ध झाली. ती बेशुद्ध असताना मुझम्मिल सईदने तिच्याशी गैरकृत्य करण्याचा प्रयत्न केला.

पण तेवढ्यात मानसीला शुद्ध आली. आता बिंग फुटेल या भीतीने मुझम्मिल सईदने पटकन स्वतःच्या बुटाच्या लेस (बुटाच्या नाड्या) काढल्या आणि त्यांच्या मदतीने गळा आवळून मानसीची हत्या केली. यानंतर मुझम्मिल सईदने मानसीचा मृतदेह एका सुटेकसमध्ये भरला. सुटेकस घेऊन मुझम्मिल सईद घरातून बाहेर पडला. एका टॅक्सीत बसायचे ती एखाद्या ठिकाणी दुसरी टॅक्सी पकडायची.

चालकाशी जास्त बोलणे टाळायचे. एखाद्या चालकाने सुटकेस बाबत चौकशी सुरू केली की लगेच टॅक्सी सोडायची आणि दुसरी टॅक्सी पकडायची. असे करत फिरत फिरत अखेर मुझम्मिल सईद मालाडमध्ये एका निर्जन ठिकाणी पोहोचला. याच ठिकाणी एका झाडाजवळ सुटकेस टाकून मुझम्मिल सईद नंतर एका ऑटो रिक्षात बसून निघून गेला.

पण जागरुक असलेल्या शेवटच्या टॅक्सी चालकाने पोलिसांना माहिती दिली. यामुळे तपास पथक अखेर मुझम्मिल सईद पर्यंत पोहोचले. पोलीस जेव्हा जोगेश्वरीत मुझम्मिल सईदच्या घरी पोहोचले त्यावेळी तो घरातले रक्ताचे डाग पुसत बसला होता. हे बघून पोलिसांनी मुझम्मिल सईदला लगेच अटक केली आणि त्याची चौकशी सुरू केली. अखेर मुझम्मिल सईदने गुन्ह्याची कबुली दिली.

# जैन धरोहर दिवस निमित्त निबंध लेखन स्पर्धेचे पारितोषिक वितरण संपन्न गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

महाराष्ट्र दिन व कामगार दिनानिमित्त विद्यालयात सुनील सुंदरलाल पाटणी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून सुनील सेठी, तर प्रमुख अतिथी म्हणून निलेश दिलीप काला, हेमंत बाकलीवाल यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात मंगलाचरण द्वारे शाळेतील शिक्षिका सुनंदा संगवे यांनी केली. शाळेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार दान दातार परिवार कडून करण्यात आला .आयुषी अभिषेक काला यांनी विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व आपल्या भाषणातुन दिले. विद्यालयाचे लिपिक श्री अजय माणिकचंद पहाडे यांच्या सेवा निवृत्ती प्रित्यर्थ त्यांचा सपत्नीक सेवा गौरव निमित्ताने स्वागत पी.यू.जैन विद्यालयाच्या वतीने करण्यात आला. जैन धरोहर कार्यक्रमाचे महावीर ठोळे, अजित लोहाडे, राजकुमार कासलीवाल, प्रमोद पाटणी, प्रमोद ठोळे, डी. बी. पहाडे. दिगंबर क्षीरसागर या मान्यवरांची उपस्थिती होती. जैन धरोहर दिवस निमित्त निबंध लेखन स्पर्धेचे पारितोषिक वितरण भारतवर्षीय दिगंबर जैन महासभेच्या वतीने करण्यात आले.

कार्यक्रमासाठी जैन शिक्षण संस्थेचे सुनील सेठी, सुनील अजमेरा, डॉ, रमेश बडजाते, राजेश कासलीवाल, शैलेश पाटणी, प्रकाशचंद कासलीवाल, चंदा कासलीवाल,रश्मी पाटणी, सुवर्णा शहा, विजय पाटोदी, शर्मिला कासलीवाल, प्रतिभा पहाडे यांची उपस्थिती होती.

ै संस्थेचे अध्यक्ष महावीर सेठी यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे व पालकांचे अभिनंदन आणि मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निलेश छाबडा यांनी केले तर आभार मुख्याध्यापिका कविता ठोळे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी शाळेतील सर्व शिक्षकांनी व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले. अशी माहिती नरेंद्र अजमेरा पियूश कासलीवाल यानी दिली.

# जैन समाजद्वारा माननीय जिल्हाधिकारी, माननीय पुलिस आयुक्त, आणि माननीय ग्रामीण पुलिस अधीक्षक यांना निवेदन देण्यात आले कड़क कार्यवाहीची मागणी



**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

खंडेलवाल दिगंबर जैन पंचायत पार्श्वनाथ मंदिर सकल जैन समाज छत्रपती संभाजीनगर च्या प्रतिनिधि मंडलाद्वारे मा जिल्हाअधिकारी श्री दिलीपजी स्वामी, पुलिस अधीक्षक श्री प्रवीण जी पवार, ग्रामीण पुलिस अधीक्षक श्री डॉ. विनयकुमारजी राठौड याना निवेदन देवुन कार्यवाही करनेसाठी विनती कारण्यात आली. माननीय जिलाधिकारी दिलीप स्वामी, पुलिस आयुक्त श्री प्रवीणजी पवार आणि ग्रामीण पुलिस अधीक्षक डॉ. विनय कुमार राठौड़ यानी सदरील प्रकरणात कड़क कार्य वाही केली जाईल , त्यानी त्वरित कार्यवाहीचे आदेश ही संबंधित पुलिस स्टेशनला देण्यात आले , सदरील प्रकरण माननीय मुख्यमंत्री कार्यालय येथे ही पाठवले जाईल असे आश्वासन ही त्यानी दिले.

जैन मुनी राष्ट्रसंत संतशिरोमनी आचार्य विद्यासागरजी महाराज यांच्याफोटोला फेसबुक या सोशलमिडीयावर अपमान जनक मॉर्पिंग करून पोस्ट केल्या बद्दल दोषीविरूध्द गुन्हा दाखल करून कार्यवाही करणेबाबत.

सध्या फेसबुक या सोशलमिडीयावर गाढे ज्ञानेश्वर भागाजी पाटील व बामनराव पिठमांगे या व्यक्तींनी जैन मुनी राष्ट्रसंत संतशिरोमनी आचार्य विद्यासागरजी महाराज यांच्या फोटोला फेसबुक या सोशलमिडीयावर अपमान जनक मॉर्फिंग करून पोस्ट केली तसेच भाजपा नेता श्री नितेश राणे यांचा चेहरा रोपीत करून अपमान जनक पोस्ट प्रकाशित केली आहे.

या कृत्यामुळे संपुर्ण जैन समाजाच्या अस्थेला तथा भावनाला गंभीर ठेच पोहचली आहे. अशा प्रकारचे आचरण केवळ धार्मिक भावनांचा अपमान करतांना सामाजिक सौदार्ह बिघडविण्याचा व सैवेधानिक अधिकार तसेच धार्मिक स्वातंत्र्याचे उल्लंघन करण्याचा पयत्न केला आहे. आपल्याकडे या आपत्तीजनक कृत्या विषयी तक्रार दाखल करत आहोत. तसेच या कृत्याबद्दल १) सदरील व्यक्तीविरूध्द त्वरीत एफआयआर दाखल करून अटक करावी व आयपीसी कलम २९५ (धार्मिक भावना भडकावण्याचे कृत्य) तसेच सुचना औद्योगिक अधिनियम कलमा प्रमाणे दोषीविरूध्द त्वरीत गुन्हा दाखल करून अटक करावी. २) सदरील अपमान

जनक पोस्ट त्वरीत हटवावे व या अकौउंटला त्वरीत कायमस्वरूपी प्रतिबंध करावा. या विषयी आपल्या वतीने सायबर सेल व सुचना औद्योगिक विभागाला सुचित करावे. ३) सदरील प्रकरण अति संवेदनशिल झाल्यामुळे आपल्या वतीने सामाजिक शांतता रहावी या दृष्टीने ऑनलाईन तथा ऑफलाईन जागरूकता अभियान संचलित करावे. ४) जैन मुनी राष्ट्रसंत संतशिरोमनी आचार्य विद्यासागरजी महाराज यांची सार्वजनिक माफी मागण्यासाठी आदेश करण्यात यावे. वरील कार्यवाहीमुळे समाजामध्ये शांततेसाठी व भविष्यात कोणीही संवेदनशिल व धार्मिक व्यक्तीद्वारा अपमान करण्याचे साहस करणार नाही. तरी आपल्या वतीने सदरील गुन्हेगारावर अटक व कार्यवाही करून समाजाला न्याय द्यावा.

या प्रसंगी महावीर पाटणी, अध्यक्ष श्री खं.दि.जैन पंचायत पार्श्वनाथ मंदीर सकल जैन समाज महासचिव, प्रकाश अजमेरा सचिव, श्री खं.दि.जैन पंचायत पार्श्वनाथ मंदीर, विश्वस्त अरुण पाटनी, तीर्थ रक्षा कमिटी उपाध्यक्ष संजय पपड़ीवाल, अग्रवाल दिगंबर जैन समाज अध्यक्ष मुकेश साहूजी, सचिव हर्षल साहूजी, जटवाड़ा तीर्थ क्षेत्र विश्वस्त अशोक गंगवाल प्रकाश कासलीवाल, श्वेतांबर जैन कॉन्फ्रेंस चे अमित कुमार जैन, दिलीप पांडे, नरेंद्र अजमेरा, पीयूष कासलीवाल, कुणाल पांडे सह पदाधिकारी उपस्थित होते.

# सत्तरीत भरलेला 'ईडी'चा घडा!

**१ मे जागतिक कामगार दिन. १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. त्याच्या आधी १ मे १९५६ रोजी अंमलबजावणी संचालनालय म्हणजे एन्फोर्समेंट डायरेक्टोरेट (आजच्या लोकप्रिय भाषेतील 'ईडी')ची स्थापना केंद्र सरकारने केली. देशातील आर्थिक गैरव्यवहारांना पायबंद घालून गुन्हेगारांवर कारवाई करण्याचे व्यापक अधिकार 'ईडी'ला आहेत. सत्तरीमध्ये नुकतेच पदार्पण केलेल्या 'ईडी' च्या भरलेल्या घड्याचा घेतलेला वेध.**

भारत सरकारच्या आर्थिक व्यवहार विभागाअंतर्गत एक मे १९५६ रोजी अंमलबजावणी संचलनालय (एनफोर्समेंट डायरेक्टोरेट) याची स्थापना झाली. १९४७ मधील परकीय चलन नियमन कायद्याचे उल्लंघन हाताळण्याच्या उद्देशाने या विभागाची स्थापना करण्यात आली. या विभागाचे नेतृत्व अंमलबजावणी संचालकांकडे होते व त्यांच्या मदतीला रिझर्व बँक व विशेष पोलीस आस्थापनातील निरीक्षक होते. ईडीची आज देशभर कार्यालये आहेत. १९७३ मध्ये परकीय चलन नियमन कायद्याची जागा परकीय चलन व्यवस्थापन कायद्याने घेतली. याची जबाबदारी याच खात्याकडे सोपवण्यात आली आहे. त्यानंतर २००२ मध्ये आर्थिक गैरव्यवहार प्रतिबंधक कायद्याची (प्रिव्हेन्शन ऑफ मनी लाँडरिंग ऍक्ट) अंमलबजावणी जबाबदारी ईडीवर आहे. त्याचप्रमाणे २०१८ मध्ये तयार करण्यात आलेल्या फरार आर्थिक गुन्हेगार कायद्याची अंमलबजावणी करण्याचे कामही ईडीकडे सोपवण्यात आले. सध्या हे अंमलबजावणी संचालनालय केंद्र सरकारच्या अर्थ मंत्रालयाच्या महसूल विभागा अंतर्गत काम करते. देशातील विविध पातळ्यांवर म्हणजे राजकारणापासून बँकिंग, भांडवली बाजार व शासकीय कंत्राटे, सामाजिक क्षेत्रात घडत असलेल्या आर्थिक गुन्ह्यांचा तपास व सामना करण्याची प्रमुख जबाबदारी ईडीची आहे. या विभागाला फौजदारी कायद्याचे अधिकार असून काळा पैसा वापरणाऱ्यांवर कारवाई करणे, काळा पैसा वापरलेली मालमत्ता जप्त करणे व संबंधित व्यक्तीला अटक करणे, संपत्ती जप्त करणे,संपत्तीचे हस्तांतरण रूपांतरण किंवा विक्री याच्यावर बंदी घालणे, असे व्यापक अधिकार आहेत. 'ईडी ' सारखी आर्थिक गुन्हेगारीला पायबंद घालणारी संस्था फक्त भारतातच आहे असे नाही. अमेरिकेत होम लँड सिक्युरिटी इन्वेस्टीगेशन्स, फेडरल ब्युरो ऑफ इन्वेस्टीगेशन(एफबीआय), इंग्लंडमध्ये नॅशनल क्राईम एजन्सी व सिरियस फ्रॉड ऑफिस, तर युरोपामध्ये युरोपियन अँटी फ्रॉड ऑफिस व युरोपियन पब्लिक प्रॉसिक्युटर्स ऑफिस अशा विविध तपास संस्था त्यांच्या देशातील आर्थिक गैरव्यवहारांना पायबंद घालण्यासाठी कार्यरत आहेत.

गेल्या काही वर्षात व विशेषतः मोदी सरकारच्या काळात ईडीला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झालेले आहे. काही आकडेवारी सांगावयाची झाली, तर १९७३ पासून ३० हजार पेक्षा जास्त प्रकरणात त्यांनी चौकशी करून संबंधित गुन्हेगारांना १० हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त दंड ठोठावला आहे.

फरार आर्थिक गुन्हेगार कायद्याखाली २०१८ पासून शंभरहून अधिक गुन्हेगारांची ओळख पटवली व त्यांची १० हजार कोटींपेक्षा जास्त किमतीची मालमत्ता जप्त केली आहे. गेल्या काही दशकांमध्ये त्यांनी टू जी स्पेक्ट्रम घोटाळा,कोळसा घोटाळा, हवाला घोटाळा, सत्यम घोटाळा यासारख्या गुंतागुंतीच्या व राजकीय लागेबांधे असलेल्या, आर्थिक अनियमितता प्रकरणांची सखोल चौकशी करून खटले दाखल केले. मोदीपूर्व काळ व मोदीत्तर काळ (२०१४ नंतरचा) अशी विभागणी करून त्याचे मूल्यमापन केले तर ते निश्चित डोळ्यांत अंजन घालणारे आहे. मोदी पूर्व काळामध्ये सत्तेवर असलेल्या काँग्रेस पक्षाने या संचलनालयाचा गैरवापर केला नाही असे नाही. विरोधकांना नामोहरम करण्यासाठी सर्वच राजकीय पक्षांनी या संचालनालयाचा वापर केला. गेल्या दहा अकरा वर्षांमध्ये ईडीची सक्रियता लक्षणीयरित्या वाढली असून त्यांचे अधिकार व संसाधने वाढलेली आहेत.

विजय मल्ल्या, रॉबर्ट वड्रा, कॉमनवेल्थ घोटाळा, नीरव मोदी, मेहूल चोक्सी अशा अनेक गुंतागुंतीच्या जटील व्यवहार व बनावट कंपन्यांचा आधार घेऊन केलेले गुन्हे ईडीला आव्हानात्मक ठरलेले आहेत. विशेषतः गेल्या दहा वर्षांत राजकारण्यांविरुद्ध १९३ प्रकरणे नोंदवूनही केवळ दोन प्रकरणात ईडीला शिक्षा देण्यात यश लाभले आहे. मार्च २०२२ अखेरच्या आर्थिक वर्षापर्यंत त्यांनी ५४२२ प्रकरणे हाताळली. मात्र त्यापैकी फक्त २३ प्रकरणात संबंधित गुन्हेगारांना शिक्षा झाल्या.

असे असले तरीही त्यांनी आजवर १ लाख ४ हजार ७०२ कोटी रुपयांची मालमत्ता जप्त केली असून ८६९.३१ कोटी रुपये रोख रक्कम जप्त केलेली आहे.

पंतप्रधान मोदींच्या काळात ईडी जास्त सक्रिय झाली आहे व आर्थिक गैरव्यवहाराबाबत अनेकांविरुद्ध कारवाई सुरू झालेली आहे हे वाढत्या आकडेवारीवरून स्पष्ट होते. या पार्श्वभूमीवर ईडीचे अप्रभावी खटले दाखल करण्याचे किंवा गुन्हेगारांना शिक्षा देण्यात अपयशी ठरण्याचे दायित्व मोठे आहे. ईडीच्या कारवाई मध्ये पारदर्शकतेचा अभाव अनेक वेळा जाणवतो.

एवढेच नव्हे, तर सर्व गुन्ह्यांचे तपशीलवार रेकॉर्ड न ठेवल्याबद्दल ईडीला उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालय तसेच राजकीय पक्षांच्या टीकेचा सामना करायला लागला आहे आहे. एकंदरीत ईडीची तपास कार्यक्षमता, गुन्ह्यांचा शोध घेताना अत्याधुनिक तंत्रज्ञानाची जोड घेतली जाते किंवा कसे याबाबत सर्वसामान्यांच्या मनात साशंकता आहे. यामुळेच ईडीच्या काही कृती निवडक राजकीय व्यक्ती किंवा गटांकडे व विशेषतः विरोधी पक्षातील राजकारण्यांबाबत पक्षपाती असल्याची भावना जनतेमध्ये आहे. एक गोष्ट निश्चित नमूद केली पाहिजे की देशातील बहुतेक सर्व राजकीय पक्ष आणि बडे राजकारणी आर्थिक गैरव्यवहार, अनियमितता, भ्रष्टाचार याच्यात लडबडलेले आहेत. त्यात कोणीही शुद्ध, प्रामाणिक व सात्विक नाही. त्यांचे प्रमाण कमी जास्त असू शकते. जनतेचा पैसा लुटण्यात ही मंडळी आघाडीवर असून गेंड्याच्या कातडीचे राजकीय नेते आहेत. राजकारणी, विविध पातळीवरील न्यायालये व प्रशासकीय अधिकारी यांची भ्रष्टाचारी हात मिळवणी न्यायालयात कोणालाही यश मिळवून देत नाहीत. ईडीने त्यांच्या कामात जास्तीत जास्त पारदर्शकता निर्माण करून जनतेचा विश्वास टिकवून ठेवण्यासाठी व प्रभावी अंमलबजावणीसाठी जबाबदारी व व्यावसायिकतेला प्राधान्य देण्याची गरज आहे. ईडीचे राजकीयकरण होणे दुर्दैवाची बाब आहे.

यामुळेच सत्तरीमध्ये पदार्पण करणाऱ्या ईडीने भविष्यकाळात राजकीय दबाव विरहित पारदर्शकपणे काम करण्यावर भर देण्याची गरज आहे. त्याचप्रमाणे या तपास संस्थेमध्ये नियमित अद्ययावत प्रशिक्षण, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर व सुधारणा केल्यामुळे त्यांची कार्यक्षमता व विश्वासार्हता सुधारण्यास निश्चित मदत होऊ शकते. मात्र या तपास संस्थेला आणखी बळकटी मिळाली नाही, तर त्यांचा 'घडा' भरलेला आहे हे लक्षात घेतले पाहिजे.

**- प्रा. नंदकुमार काकिर्डे**

(लेखक पुणेस्थित अर्थविषयक ज्येष्ठ पत्रकार असून माजी बँक संचालक आहेत)

# वृक्ष लागवड, संवर्धन करुन जनसहयोग संस्था करीत असलेल्या पर्यावरण संवर्धन कार्याचे उपमुख्यमंत्र्यांनी केले कौतुक

## उपमुख्यमंत्री पवार यांची पडेगाव येथील 'संपूर्ण वन' उपक्रमास भेट

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

पडेगाव येथे जनसहयोग या संस्थेने विकसित केलेल्या 'संपूर्ण वन' उपक्रमास आज उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी भेट देऊन पाहणी केली. वृक्ष लागवड, संवर्धन करुन जनसहयोग संस्था करीत असलेल्या पर्यावरण संवर्धन कार्याचे श्री. पवार यांनी कौतुक केले.



उपमुख्यमंत्री पवार हे आज शहरात आले होते. त्यावेळी त्यांनी पडेगाव येथील पुण्यश्लिक अहिल्यादेवी मेंढी व शेळी विकास प्रक्षेत्र परिसरात जनसहयोग या संस्थेच्या उपक्रमातून 'संपुर्ण वन'ही वनवाटीका विकसित करण्यात आली आहे. या ठिकाणी उपमुख्यमंत्री पवार यांनी आज भेट दिली. विधान परिषदेचे आ.सतिष चव्हाण, आ. विक्रम काळे त्याचे समवेत होते. संस्थेचे अध्यक्ष प्रशांत गिरे यांनी उपक्रमाची माहिती दिली. या प्रक्षेत्रावर २२ हजार वृक्ष लागवड करण्यात आली असून त्यात ४०० प्रजातीचे वृक्ष, वनस्पती इ. चा समावेश आहे. या उद्यानामुळे परिसरातील जैवविविधता विकासाला चालना मिळाली आहे, असेही यावेळी सांगण्यात आले. वृक्ष लागवड, वृक्ष देखभाल इ. कामे करणाऱ्या कामगारांशी श्री. पवार यांनी चर्चा केली. याठिकाणी साकारलेल्या भारत उद्यान, नक्षत्र उद्यान, बांबू उद्यान अशा विविध उद्यानांना भेट देऊन श्री. पवार यांनी पाहणी केली. लागवड झालेल्या वृक्ष प्रजातींची माहितीही त्यांनी करुन घेतली. विविध प्रजातीच्या वनस्पती, फुले, वेली आदी एकाच क्षेत्रात असल्याने याठिकाणी संशोधन केंद्र स्थापन करावे,अशी मागणी ही संस्थेच्या वतीने करण्यात आली. संस्थेचे संदीप जगधने, नंदन जाधव, मिलिंद गिरधारी आदी यावेळी उपस्थित होते.

पान१ वरून

### खुलताबाद शहरात एमआयएम पक्षाला खिंडार; शेकडो कार्यकर्त्यांचा काँग्रेसमध्ये प्रवेश

एमआयएम पक्षाची या ठिकाणी मजबूत पकड होती,मात्र त्यांच्या या निर्णया मुळे काँग्रेस पक्षाला आगामी निवडणुकांमध्ये नव्या ताकदीची भर मिळेल, असा अंदाज राजकीय वतुर्ळात व्यक्त केला जात आहे. या प्रसंगी बोलताना मणियार म्हणाले, काँग्रेस हा विचारांचा पक्ष आहे. सर्वसामान्यांच्या हक्कासाठी लढणारा पक्ष म्हणून काँग्रेसकडे पाहिले जाते.जनतेच्या प्रश्नांवर अधिक प्रभावीपणे काम करण्यासाठी मी माझ्या कार्यकर्त्यांसह काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे.ङ्ग कार्यक्रम ात जिल्हा काँग्रेसचे नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.काँग्रेसचे प्रभारी कुणाल चौधरी यांनी मणियार यांचे स्वागत करताना म्हटले.

# जनकल्याण समाज उन्नत पत्रकार संघटनेच्या वतीने ठाणेदार संग्राम पाटील सन्मानित



**सिद्धेश्वर देव्हरे - चिखली**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

चिखली पोलीस स्टेशनचे कर्तव्यदक्ष ठाणेदार मा श्री संग्राम पाटील साहेब यांनी पोलीस प्रशासनाम ध्ये अल्पावधीतच लोकप्रियता = कर्तव्याची व कायद्याची अंमलबजावनी करनारे सर्वांप्रती समान व्यवहार ठेवुन पोलीस प्रशासनाचा नावलौंकीक मिळवला आहे त्यांनी बुलढाणा लोकसभा / चिखली विधानसभा निवडणुका नि:पक्ष वर्तन ठेवुन अत्यंत संयमाने नियंत्रीत ठेवुन निवडणुका पार पाडल्या अशा परस्थितीत एकही तक्रार येवू दिली नाही तसेच शहरातील छत्रपती शिवाजी महाराज जयंती व डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती अत्यंत सलोख्याच्या वातावरनामध्ये साजरी करण्याचे पोलीस प्रशासनाचे कौशल्य दाखुन दिले आहे.

तसेच त्यंना नुकताच पोलीस म हासंचालक पदक देखिल मिळाला आहे त्या पोलीस महासंचालक पदकामुळे त्याचा मोठ्या स्वरूपात नावलौंकीक निर्माण झाला आहे त्यंच्या या सर्वोत्कृष्ट पोलीस दलातील सेवेनिमित्त जनकल्याण समाज उन्नत पत्रकार संघटनेच्या वतीने त्यांचा शाल - पुष्पगुच्छ व सम्मानपत्र देवुन सत्कार करण्यात आला या वेळी जनकल्याण समाज उन्नत पत्रकार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष विनोद पवार, जिल्हाध्यक्ष विजुभाऊ जयसवाल, तालुका अध्यक्ष मंगेश भोलवनकर, कार्याध्यक्ष प्रशांतभाऊ जैवाळ, कदीर भाई, सिध्देश्वर देव्हरे, हरसिंग छर्रे, राधेश्याम काळे अनेक पदाधिकारी देखिल उपस्थित होते

# राष्ट्रीय खाद्यतेल अभियान; मूल्यसाखळी भागीदार होण्यासाठी इच्छुक संस्थांकडून अर्ज मागविले

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

राष्ट्रीय खाद्यतेल अभियान-तेलबिया सन २०२५-२६ अंतर्गत सोयाबीन व भुईमुग या पिकासाठी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याची निवड केली आहे. या योजनेंतर्गत पिकनिहाय मुल्यासाखळी भागीदार यांच्यामार्फत संपूर्ण जिल्हा कार्यक्षेत्रात समूहामध्ये प्रमाणित बियाणे वितरण, शेतकरी प्रशिक्षण व शेतीशाळा इ. घटक राबवायचे आहेत. त्यासाठी इच्छुक शेतकरी उत्पादक कंपनी ,सहकारी संस्था यांच्याकडून अर्ज म ागविण्यात आले आहेत.

**पात्रता निकष :**

१. कंपनी कायदा किंवा सहकारी कायद्यांतर्गत नोंदणी केलेली असावी.

२. ज्या जिल्ह्यात समूह तयार झाला आहे तेथे काम करण्याचा किमान ३ वर्षाचा अनुभव असावा. म्हणजेच नोंदणी माहे मार्च, २०२२ पूर्वीची असावी.

३. किमान २०० शेतकरी, उत्पादक कंपनी (FPC) मध्ये किंवा सहकारी संस्थेमध्ये नोंदणीकृत असावेत.

४. सहकारी संस्था असल्यास संस्थेच्या उद्दिष्टांम ध्ये तेलबिया पिकांत काम काजाबाबत नमूद असावे.

५.मागील ३ वर्षातील सरासरी वार्षिक उलाढाल ९ लाख रुपयापेक्षा जास्त असावी.

६.शेतकरी उत्पादक कंपनी (FPC) मध्ये शेतकऱ्यांचा किमान ३ लाख रुपयांचा सहभाग असावा.

७.शेतकरी उत्पादक कंपनी/सहकारी संस्था प्राधान्याने कमी उत्पादकता असणाऱ्या तालुक्यामध्ये कार्यरत असावी.

८.सरकारकडून अनुदान प्राप्तकर्त्या शेतकरी उत्पादक संघाला प्राधान्य दिले जाईल.

शेतकरी उत्पादक संघ (FPOs) योजनेंतर्गत तयार केलेले शेतकरी उत्पादक कंपनी (FPCs), NAFED, NSC-OS इ. सार्वजनिक संस्थांकडे नोंदणीकृत तेलबियाशी संबंधित शेतकरी उत्पादक कंपनी (FPCs) यांना पात्रता निकष पूर्ततेच्या आधारे निवड केली जाईल.

# ४९ केंद्रांवर 'नीट' परीक्षा सुरळीत

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

नीट २०२५ची परीक्षा आज शहरातील ४९ केंद्रांवर पार पडली. तब्बल १९ हजार ५०० विद्यार्थी या परीक्षेसाठी प्रविष्ठ होते. त्यापैकी १९१७९ विद्यार्थ्यांनी ही परीक्षेस हजेरी लावली. उपस्थितीची टक्केवारी ९८.३५ टक्के इतकी होती. परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी प्रशासनाने सज्जता केली होती. वाढत्या उन्हाची स्थिती पाहता प्रत्येक परीक्षा केंद्रावर पिण्याचे पाणी, सावलीची सोय आदी सुविधा करण्यात आल्या शिवाय प्रत्येक परीक्षा केंद्रावर वैद्यकीय पथक देखील सज्ज ठेवण्यात आले होते. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी स्वतः काही परीक्षा केंद्रांना भेटी देऊन परीक्षा केंद्रावर उपलब्ध सुविधा व सज्जतांची पाहणी केली. कोणताही अनुचित प्रकार न होता परीक्षा सुरळीत पार पडली अशी माहिती उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) श्रीमती संगिता राठोड यांनी दिली.



# ९ मे रोजी मोटारसायकल रॅली व भव्य मिरवणुक शुरविर महाराणा प्रतापसिंह जयंतीनिमित्त कार्यक्रम

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

दरवर्षी प्रमाणे यंदाही शुरविर महाराणा प्रतापसिंह यांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम आयोजन करण्यात आले आहे.९ में रोजी सकाळी ८.३० रोजी सकाळी म हाराणा प्रतापसिंह उद्याण सिडको येथुन भव्य मोटारसायकल रॅली निघणार बजरंग चौक टिव्ही सेंटर जिल्हा अधिकारी कार्यालय बसस्थानक बाबा पेट्रोल पंप क्रांती चौक दुध डेअरी रोपळेकर चेत्तक चौक गजानन महाराज मंदिर पुंडलिकनगर जयभवानीनगर व विसर्जन महाराणा प्रतापसिंह उधाण येथे असून प्रमुख पाहुणे म्हणून उद्घाटन अतुल जी सावे व पालकमंत्री संजय सिरसाठ जी प्रमुख पाहुणे, डॉ खा.भागवत कराड आमदार संजय कणेकर, , आ.प्रदिप जैस्वाल,मा.खा उत्तमसिंग पवार,तर सायंकाळी टि व्ही सेंटर येथुन महाराणा प्रतापसिंह जयंतीनिमित्त मिरवणूक सायंकाळी सहा वाजता सुरू होईल.



वाजत गाजत घोडे, बँड बाजा डिजे रथ विविध पोशाखात वाजत गाजत बजरंग चौक महाराणा प्रतापसिंह उद्याण येथे विसर्जन मिरवणुकीत सामील होणार आहेत जालना व छत्रपती संभाजीनगर येथील समाज बांधव सहभागी होणार आहेत.

जयंती उत्सव समितीचे कवरसिंग बैनाडे अध्यक्ष सुभाष महेर उप अध्यक्ष एल डी ताटू, अंजली कोकुल्डे, अमरसिंग परदेशी, अँड सुभाष कोकुल्डे आनंद बारवाल नारायण उटाडे महाजन चुगडे, पदमसिंग राजपूत, विक्रम पवार,शाम सिंगल,सुदाम राजपूत महेंद्रसिगं बारवाल विजू म ारग,रामू सोनेत भाग्यश्री राजपूत भारती राजपूत लताबाई ठाकुर बैनाडे, नारायण महेर कैलास जोनवाल, नरेंद्र गिरासे भावसिंग बैनाडे, सचिन बैनाडे आदी.

# उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेत देवगिरी महाविद्यालयाची उज्वल यशाची परंपरा कायम

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**


उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेत देगिरी महाविद्यालयाने दरवषीप्रमाणं यावयों सुध्दा गुणवत्तेची उज्वल परंपरा कायम राखत घवघवीत यश संपादन केले आहे.

देवगिरी महाविद्यालयाच्या विज्ञान शाखेचा निकाल ९७.४८ टक्के, वाणिज्य शाखेचा निकाल ९८.९६ टक्के, कला शाखेचा निकाल ८८.९५ टक्के तर व्होकेशनल शाखेचा निकाल १००,०० टक्के लागला आहे. महाविद्यालयाच्या कला, वाणिज्य, विज्ञान व व्होकेशनल शाखेतील ८५५ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले आहे. वाणिज्य शाखेत कु.भाले स्वानंदी आतिश हो विद्याथीनी ९६.६७१७ प्रथम, कु. संतोंसे अनुश्री अविनाश ९६.००% द्वितीय, कु लोणे येधिका दिनेश ९५.६७% तृतीय आले असून १११ विद्यार्थ्यांनी ९०.००% पेक्षा अधिक गुण मिळवले आहेत. कला शाखेत जाधव सुदर्शन साईनाथ ९५.८३% प्रथम, कु. आव्हाळे वैष्णवी नातंराव ९४.५०% व कू पवार संध्या देविदास ९४.५०% द्वितीय, कु गवळीकर राधिका अजय ९४.००% आले असून २१ विद्यार्थ्यांनी ८५.००% पेक्षा अधिक गुण मिळवले आहेत. विज्ञान शाखेत कु कारले सिध्दी राधाकृष्ण ८८.८३% व कु. मरकंदे ईश्वरी मनोज ८८.८३ प्रथम, देशमुख अर्णय तानाजी ८८.६७९% द्वितीय, कु. मुळे मृदुला देवेंद्र ८८.५०% तृतीय आले असून २८ विद्यार्थ्यांनी ८५.००% पेक्षा अधिक गुण मिळवले आहेत. व्होकेशनल शाखेत कवटकर वल्लभ मनोज ८४८३% प्रथम, कुशवंतसिंग राम गादिया ८१.५०% द्वितीय, वाघ सम्यक रामदास ८१.३३% तृतीय गुण मिळवले आहे. महाविद्यालयातील कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील १४ विद्यार्थ्यांनी संस्कृत विषयात १०० पैकी १०० गुण प्राप्त कले आहे. १५ विद्यार्थ्यांनी पाली विषयात १०० पैकी १०० गुण प्राप्त केले. महाविद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांचे मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे सरचिटणीस आमदार श्री. सतीश चव्हाण, महाविद्यालय विकास समितीचे ज्येष्ठ सदस्य श्री. पंडितराव हर्षे अण्णा, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक तेजनकर, विज्ञान विभागाचे उपप्राचार्य प्रा. नंदकिशोर गायकवाड, कला व वाणिज्य विभागाचे उपप्राचार्य प्रा. सुरेश लिपाने व व्होकेशनल विभागाचे उपप्राचार्य प्रा विजय नलावडे यांनी गुणवंतांचे अभिनंदन केले.

# महाराणा प्रताप जयंती २०२५ उत्सव समिती जाहीर अध्यक्षपदी सुभाष महेर

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**







क्रांतीसुर्य वीरशिरोमणी महाराणा प्रताप यांच्या ४८५ वी जयंती उत्सव समिती २०२५ ची कार्यकारणीची निवड कनॉट येथील महाराणा प्रताप उद्यानात झालेल्या सकल राजपूत/परदेशी समाज बैठकीत करण्यात आली. बैठकीचे अध्यक्ष कवरसिंग बैनाडे होते. बैठकीत उत्सव सप्ताह साजरा करणे, गुणवंतांचा सत्कार, व्याख्यान, निबंध स्पर्धा, जन जागृती, होतकरु विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व आर्थिक साहाय्य असे विविध कार्यकम घेण्यात येणार आहे. जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी सुभाष मेहर, सचिवपदी अजब सिंग शिहरे कोषाध्यक्षपदी तोताराम बहुरे कार्याध्यक्षपदी अमरसिंग परदेशी , उपाध्यक्ष लालचंद डी. ताटू,विशाल चव्हाण, काळूसिंग राजपूत, रामसिंह बहुरे, विश्वनाथ राजपूत, चंदा राजपूत,भाग्यश्री राजपूत,अंजली कोकुल्डे प्रसिद्धीप्रमुख नारायण उटाडे,महाजन चुंगड़े, महेंद्र बारवाल, महिला सदस्य गिताताई शेवगण, रेखा काकरवाल, लीलाताई राजपूत कल्पना राजपूत सहसचिव पदी विक्रम पवार, सचिन बैनाडे जयपाल ठाकूर चंदनसिंग कहाते, दिलीप घुणावत, आनंद बारवाल जादूसिंग महेर, राजू चुगडे, गणेश राजपूत, रैली प्रमुख बिजू मारग,रामू राजपूत,सुदाम राजपूत,सदस्य ताराचंद राजपूत,प्रताप जारवाल,संजय गोमलाडू, चरण जारवाल शक्तिसिंग छानवाल, कैलास जोनवाल धीरेन्द्रसिंग बिलवाल, गोवर्धन शेवगण,कल्पेश ताटू, रुचिक खोकड, नारायण महेर,जितेंद्र निकम, कैलास करघे, नरेंद्र गिरासे ओंकार सिंगल, बाबुलाल राजरवाल, मार्गदर्शक कवरसिंग बैनाडे, नंदलाल राजपूत,डॉ जीवन सिंग राजपूत, जगतसिंग परिहार, पदमसिंग राजपूत, प्रा.भिमसिंग कहाटे, अँड. सुभाष कोकुल्डे जयसिंग होलिये, विजयसिंग झाला. विनोद पवार, भरतसिंग घुनावत, जयसिंह खोकड़, चेतन खोकड, दुर्गासिंग महेर,भाऊसिंग बैनाडे यांची निवड करण्यात आली.

# उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडून सारथी संस्थेच्या नव्या इमारतीची पाहणी

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**




राज्याचे उपमुख्यमंत्री तथा वित्त मंत्री अजित पवार यांनी आज शहरातील दत्ताजी भाले रक्तपेढी जवळ नव्याने बांधण्यात येत असलेल्या छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्थेच्या अर्थात सारथीच्या इमारतीची पाहणी केली. यावेळी उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी नवीन इम ारतीच्या कामाबाबत माहिती जाणून घेतली. तसेच या कामाच्या प्रगतीचा आढावा घेतला.

यावेळी श्री. पवार म्हणाले, छत्रपती संभाजीनगर येथे सारथी संस्थेचे सुरू असलेले काम दर्जेदार झाले पाहिजे. रेन वॉटर हार्वे स्टिंग, सौर ऊर्जा यंत्रणा व संस्थेच्या परिसरात वृक्षारोपण करा, असे सांगतानाच त्यांनी कामाची पाहणी करून आवश्यक त्या सूचना दिल्या. यावेळी कार्यकारी अभियंता श्रीमती पुजारी यांनी यांनी सारथी संस्थेच्या सुरू असलेल्या कामाबाबत सविस्तर माहिती दिली.

यावेळी आमदार विक्रम काळे, आमदार सतीश चव्हाण यांच्यासह विभागीय आयुक्त दिलीप गावडे, पुणे विभागाचे मुख्य अभियंता अतुल चव्हाण, सारथी संस्थेचे प्रभारी उपव्यवस्थापकीय संचालक रामदास दौंड, छत्रपती संभाजीनगर विभागाचे मुख्य अभियंता श्रीनिवास कातकडे, अधीक्षक अभियंता सुंदरलाल भगत, कार्यकारी अभियंता प्रिया पुजारी, जलसंपदा विभागाच्या कार्यकारी अभियंता योगिता जोशी यांच्या सह संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मालक, मुद्रक , प्रकाशक - श्री. **रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५ ए , सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर , सिडको, औरंगाबाद (महा.) - ४३१००५ येथे छापून शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७, सिडको पोलीस स्टेशन जवळ, औरंगाबाद (महा.)- ४३१००३ येथे प्रसिध्द केले.

• **संपादक : रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** • मो. **7588166496** • Email : **attalsanket2023@gmail.com** • **RNI No. MAHMAR/2023/87816**

This Daily Printed, Published and Owned by **RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** Printed at Mansi Printers, Plot No. 45 A, Service Industry Sector, Aurangabad (M.S.)- 431005 and Published at Shop No. 3, Keshardeep Complex, N-7, Near Cidco Police Station, Aurangabad (M.S.)- 431003

• **Editor : RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** • मो. **7588166496** • Email : **attalsanket2023@gmail.com** • **RNI No. MAHMAR/2023/87816**